सकाळ TODAY

# साहित्य संवाद निर्माण करते : डॉ. दौंड

## बाबूजी आव्हाड महाविद्यालयात साहित्यजागर कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

पाथर्डी, ता. १२ : "साहित्य व कला क्षेत्रात आत्मप्रतिभा महत्त्वाची असते. व्यक्त होण्याचे सामर्थ्य कवी व विचारवंतांमध्ये असते. राजकारणी व साहित्यिकांतील दरी वाढत चालल्यामुळे समाज बिघडत चालला आहे. साहित्य संवाद निर्माण करते," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. कैलास दौंड यांनी केले.

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात स्वातंत्र्यसेनानी (स्व.) बाबूजी आव्हाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित 'साहित्यप्रेमी बाबूजी आव्हाड साहित्यजागर' कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार अविनाश मंत्री होते. पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, मराठवाडा साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष अनंत कराड, उपाध्यक्ष सुरेश आव्हाड, प्राचार्य अशोक दौंड, सुनील साखरे, संदीप काळे, विश्वजित गुगळे, रामकिसन शिरसाठ, लक्ष्मण खेडकर, अर्जुन देशमुख, वसंत होळकर, ज्योती आघाट, हुमायून आतार, निवृत्ती शेळके, चंद्रकांत उदागे, बबन शेवाळे, शरद मेढे उपस्थित होते.

डॉ. दौंड म्हणाले, "पाथर्डी तालुक्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व साहित्यिक क्षेत्रात माजी आमदार (स्व.) बाबूजी आव्हाड यांचे मोलाचे योगदान आहे. पाथर्डी तालुक्यातील साहित्यिक ऊसतोडणी कामगारांवर लिहितात, पण बाबूजींनी त्यांची परिस्थिती बदलण्याचे महान कार्य केले. ऊसतोडणी कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा करायची असेल तर त्यांना अनुदान, मदत न देता त्यांच्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांच्या मेंदूचा विकास केला पाहिजे, तरच त्यांच्या हातातून कोयता जाईल. म्हणूनच त्यांनी या गोरगरीब जनतेसाठी पार्थ विद्या प्रसारक मंडळाची स्थापना केली. पाथर्डी तालुक्यात शिक्षणाची गंगा आणणारे भगीरथ म्हणजे बाबूजी होत. बाबूजींचा त्याग नव्या पिढीला कळण्यासाठी नवसाहित्यिकांनी लिहिते व्हावे."

अजय रक्ताटे यांच्याकडून कवींना काव्यसंग्रह भेट देण्यात आला. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात (स्व.) बाबूजी आव्हाड जन्मशताब्दी व ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, सूत्रसंचालन डॉ. बबन चौरे यांनी केले. आभार डॉ. सुभाष शेकडे यांनी मानले.